ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 10 | JUNE - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# पर्यटनात ऐतिहासिक किल्ल्यांचे महत्त्व



**डॉ.जिजाबाई कांगणे**
**लोकप्रशासन विभाग प्रमुख**
**वैद्यनाथ कॉलेज,परळी-वैजनाथ जि.बीड.**

## प्रस्तावना :-

प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक काळातील मानवी संस्कृतीची जी ऐतिहासिक वाटचाल आहे. त्याचाच एक अविभाज्य भाग म्हणजे मानवी ऐतिहासिक वाटचाल आहे. त्याचाच एक अविभाज्य भाग म्हणजे मानवी पर्यटनक्रिया होय. म्हणूनच मानवाच्या पर्यटनक्रियेला मानवी इतिहासापासून वेगळे कराढता येत नाही. मानवी पर्यटन प्रवृत्ती व उद्दिष्टे, पर्यटनाचा पर्यटनस्थळांची पार्श्वभूमी व महत्त्व या सर्वांच्या ठायी इतिहासच असतो. म्हणूनच पर्यटनात इतिहासाी भूमिका ही अत्यंत महत्त्वाची व मोलाची आहे.

भारताला प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. त्यामुळे प्राचीन आणि मध्ययुगीन वास्तु स्मारके मोठ्या प्रमाणात आढळतात. या वास्तु, स्मारके, किल्ले ज्या ठिकाणी आहेत. ती स्थळे ऐतिहासिक पर्यटन स्थळे ठरतात. ऐतिहासिक स्थळेच नसतील तर ऐतिहासिक पर्यटन होऊ शकत नाही. त्यामुळे ऐतिहासिक पर्यटन स्थळांना व ऐतिहासिक किल्ल्यांना पर्यटनात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. कोणत्याही पर्यटनस्थळांचे महत्त्व समजून घेत असताना संबंधित पर्यटनस्थळांच्या भौगोलिक व नैसर्गिक पार्श्वभूमी बरोबरच त्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेणे अनिवार्य ठरते.

## शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये :-

1) पर्यटनात ऐतिहासिक किल्ल्यांचे महत्त्व यांचा अभ्यास करणे.
2) महाराष्ट्रातील ऐतिहासिक किल्ल्यांचे महत्त्व व माहिती जाणून घेणे.
3) पर्यटन व इतिहास यांच्या संबंधाचा अभ्यास करणे.

## संशोधन पध्दती :-

प्रस्तुत शोधनिबंध लेखनासाठी वर्णनात्मक विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला असून त्यासाठी आवश्यक असणारी माहिती ही विविध संदर्भग्रंथ वृत्तपत्रे, मासिके या द्वितीय तथ्य संकलनाच्या साधनाद्वारे प्राप्त करण्यात आली आहे.

## पन्हाळा :-

कोल्हापुरपासून 18 मैल अंतरावरील पन्हाळा किल्ल ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. पन्हाळ गडावर कवी मोरोपंतांचे जन्मस्थान व रामचंद्रपंत अमात्यांची समाधी आहे. बाजीप्रभू देशपांडे यांचा पुतळाही आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील अनेक प्रसंग येथे घडले आहेत. इ.स.1660 मध्ये छत्रपती पन्हाळ्यावर असताना सिध्दी जोहरने पन्हाळाभोवती वेढा घालून अतिशय पध्दतशीरपणे महाराजांना कोंडीत पकडले होते. हे उत्तम हिलस्टेशन म्हणून ही प्रसिध्दीस येऊ लागले आहे.

## सिंधुदुर्ग :-

सुमारे 48 एकर क्षेत्रावर शिवाजी महाराजांनी हा किल्ला उभारला. किल्ल्याच्या तटाला 42 बुरुज आहेत. गडावर भवानी व महादेवांचे मंदिर आहे. किल्ल्यास 4 कि.मी. लाभ 1 मीटर उंच, 3 मीटर रूंद तर आहे. किल्ल्याचा पाया सिसे ओतून उभारला आहे. 300

कामगार 3 वर्षे किल्ला बांधणीचे काम करीत होते. हा किल्ला बांधणीचे काम करीत होते. हा किल्ला सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणपासून खडकाळ बेटावर उभारला आहे.

**तोरणा :-**

शिवाजी महाराजांनी जिंकलेला पहिला किल्ल म्हणजे तोरणा होय. हा किल्ला जिंकून त्यांनी स्वराज्याचे तोरण बांधणे तोरणाची उंची 4606 फुट आहे. हा किल्ला 'प्रचंडगड' या नावानेही ओळखला जातो.

**सिंहगड :-**

'गड आला पण सिंह गेला' अशी म्हणच पडली. पण ते उद्‌गार आहेत शिवरायांचे पुण्याच्या दक्षिण-पश्चिमेला 26 कि.मी. अंतरावर हा किल्ला आहे. उदयभानू व तानाजी यांच्यात लढाई होऊन त्यात तानाजी मालुसरे मारला गेला. सिंहगडावर दरसाल 6000 पर्यटकांची गर्दी असते.

**रायगड :-**

य किल्ल्याचे मूळ नाव 'रायरी' होते. हे महाराष्ट्राचे स्फूर्तिस्थान आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी राजधानी म्हणजे रायगड. 25 वर्षे शिवाजी महाराज रायगडावर वास्तव्याल होते. 7 वर्षे याच गडावरून राज्यकारभार केला. समुद्रसपाटीपासूनच रायगडाची उंची 2500 फुट आहे. शिवरायांचे निधन येथेच झाले.

**अजिंक्यतारा :-**

या किल्ल्यावरून संपूर्ण सातारा शहर न्याहळता येतो. साताऱ्यात येणारा पर्यटक हा किल्ला पाहतोच. या किल्ल्यावर अनेक ऐतिहसिक घटना घडल्या आहेत. आदिलशहाची पत्नी चांदबीबी येथे इ.स.1580 मध्ये कैद होती. इ.स.1673 मध्ये हा किल्ला शिवरायांच्या ताब्यात आला. इ.स.1699 मध्ये औरंगजेबाने अजिंकताऱ्याला वेढा घातला. मराठे दगड-गोट्यांचा मारा करून करून झुंजत होते, पण बुरुजाखाली सुरुंग लावून किल्ला औरंगजेबाने हस्तगत केला. इ.स.1707 मध्ये शाहु राजाने हा किल्ला जिंकला. इ.स.1818 मध्ये ब्रिटिशांनी तो सातारकरांकडून बळकावला. समुद्रसपाटीपासून हा किल्ला 100 मीटर उंचीवर आहे.

**पांडवगड :-**

वाईच्या उत्तरेला आणि भोरच्या दक्षिणेला हा किल्ला आहे. समुद्रसपाटीपासून त्याची उंची 4170 फुट आहे. इ.स.1673 मध्ये हा किल्ला शिवरायांच्या ताब्यात होता. इ.स.1701 मध्ये औरंगजेबाच्या ताब्यात होता. इ.स. 1818 मध्ये ब्रिटिशांच्या ताब्यात तो गेला. हा किल्ला शिलाहार कालीन आहे.

**राजगड :-**

गडांचा राजा व राजांचा गड असा नावलौकिक गडास प्राप्त झाले आहे. पुण्याच्या दक्षिण-पश्चिमेला सुमारे 40 कि.मी. अंतरावर हा किल्ला असून त्याची समुद्रसपाटीपासून उंची 4514 फुट आहे. रायभिषेकापूर्वी याच गडावरून स्वरायाचा कारभार चालत असे.

**जंजिरा :-**

अलिबागच्या दक्षिणेला 48 कि.मी. अंतरावर मुरुड या तालुक्याच्या गावाच्या दक्षिणेला 2 कि.मी. अंतरावर समुद्रात हा किल्ला आहे. किल्ल्याची तटबंदी अतिशय भक्कम असून चहुबाजूंनी हा किल्ला पाण्याने वेढलेला आहे. संपूर्ण तटबंदीवर साधारणत: 30 ते 40 फुट उंचीचे 19 बुरुज आहेत. शिवछत्रपतींच्या काळात या किल्ल्यावर 3 स्वाऱ्या झाल्या, पण हा किल्ला त्यांच्या शेवटपर्यंत हाती लागला नाही. संभाजी राजे व पेशव्यांनी ही हा किल्ला घेण्याचे प्रयत्न केले, पण त्यांना ही यश आले नाही. भक्कम तटबंदी, भोवतालचा खवळलेला समुद्र व दूरपर्यंत हल्ला करू शकणाऱ्या प्रचंड तोफा यामुळे एक अजिंक्य किल्ला म्हणून जंजिरा इतिहासात प्रसिध्द आहे.

**कोरलई किल्ला :-**

अजिबागच्या दक्षिणेला 90 कि.मी. अंतरावर हा छोटेखानी सागरी किल्ला आहे. पोतुगीजकालीन चर्चचे अवशेष व बुरुजावर काही तोफा आहेत. निजाम, पोर्तुगीज, मराठे व शेवटी इंग्रज अशा निरनिराळ्या राजवटी या किल्ल्याने पाहिल्या. ऐतिहासिक गोष्टी बरोबरच इथे निसर्गसौंदर्य भरपूर आहे.

**प्रतापगड :-**

महाबळेश्वरच्या एल्फिन्स्टन पॉइंटवरून नजर टाकली तर प्रतापगड दिसतो. अफजलखानचा वध शिवछत्रपतींनी येथे केल्यामुळे प्रतापगडास महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रतापगड हा पूर्णपणे महाराजांनी बांधलेला गड आहे. इ.स.1650 मध्ये तो बांधून पूर्ण झाला. महाराजांनी भवानी देवीची स्थापना इथेच केली. अफझलखानची कबर येथे आहे. इ.स.1957 मध्ये पं.नेहरुंच्या हस्ते प्रतापगडावर शिवरायांचा पुतळा बसवला गेला.

**शिवनेरी :-**

जुन्नर जवळचा शिवनेरी किल्ला हे शिवरायांचे जन्मस्थळ आहे. बहामनी सरदारने हा किल्ला इ.स.1443 मध्ये यादवांकडून घेतला. या किल्ल्याच्या 3 बाजूस लेण्या आहेत.

**लोहगड-विसापूर :-**

पुणे-मुंबई महामार्गावर मळवी स्टेशनजवळ हे दोन किल्ले आहेत. हे किल्ले सातवाहन काळात बांधण्यात आलेले असावेत असा अंदाज बांधता येतो.

**सज्जनगड :-**

श्री समर्थ रामदास स्वामींच्या वास्तव्यामुळे शिवकाळात सज्जनगडास महत्त्व प्राप्त झाले होते. 'परळीचा किल्ला' या नावाने ओळखला जाणारा हा किल्ला सन 1673 मध्ये शिवाजी महाराजांनी विजापूरकरांकडून जिंकून घेतला होता. इ.स.1682 मध्ये श्री रामदास स्वामी समाधिस्त होईपर्यंत त्यांचे वास्तव्य याच किल्ल्यावर होते. हा किल्ला साताऱ्यापासून 15 कि.मी. अंतरावर आहे. संभाजी राजांनी समर्थांची समाधी तेथे बांधली.

**माहुली किल्ला :-**

पुणे-नाशिक मार्गावर हा किल्ला आहे. जिजाऊ व शिवबांचे किल्ल्यावर काही काळ वास्तव्य होते. पुरंदरच्या तहामुळे मोगलांच्या ताब्यात गेलेला हा किल्ला जिंकून घेण्यात शिवरायांना यश आले नाही.

**दौलताबादचा किल्ला :-**

या किल्ल्याचे काम कोणी केले. हा मतभेदाचा विषय आहे. यादवसम्राट भिल्लम याने 12 व्या शतकात हा किल्ला बांधला असे एक मत आहे. इ.स.1294 मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने या किल्ल्यावर आक्रमण केले. पुढे मलिक फूरनेही दौलताबादवर आक्रमण केले. इ.स.1327 मध्ये भारताचे मध्यवर्ती ठिकाण म्हणून मोहम्मद तुघलकने दिल्लीवरून दौलताबादला आपली राजधानी केली. पण पुन्हा त्याने आपली राजधानी दिल्लीस नेली. 15 व्या शतकात हा किल्ला निजामाच्या ताब्यात गेला. इ.स.1633 मध्ये हा किल्ला मोगल बादशहा शहाजहानकडे आला. दक्षिणेचा सुभेदार म्हणून जेंव्हा औरंगजेब आला. तेंव्हा तो याच किल्ल्यात राहत होता. इ.स.1784 नंतर हा किल्ला हैदराबादच्या निजामांच्या ताब्यात गेला. किल्ल्यात 64 मीटर उंचीचा एक मनोरा आहे. त्यास चांदमिनार म्हणतात. उल्लाउद्दीन बहामनी याने इ.स.1435-1457 या काळात तो बांधला. हा किल्ला अत्यंत नामांकित आहे. हा किल्ला पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र बनला आहे.

**निष्कर्ष :-**

ऐतिहासिक किल्ले हे आज पर्यटकांचे केंद्र झालेले दिसतात. दळणवळणाच्या सोयी सुविधांमुळे दूर-दूरवरून पर्यटक किल्ले पाहण्यासाठी जातात. इतिहासातील घटना ह्या लोकांना एक प्रकारचे कुतूहल निर्माण करतात. शिवकाळात पेशवे कालखंडात किल्ल्याभोवतीच इतिहास घडला. हे ऐतिहासिक किल्ले पाहण्याचे आकर्षण लोकांच्या मनात असते. प्रत्येक किल्ला हा इतिहासाचा साक्षीदार आहे. पर्यटनाच्या क्षेत्रात इतिहासाला महत्त्वाचे स्थान आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**

1) डॉ.कठारे, डॉ.पाटील, डॉ.साखरे : पुरातत्व विद्या वस्तु संग्रहालय आणि पर्यटन, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, 2015.
2) डॉ.एस.एस.गाठाळ : इतिहासाच्या शाखा, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, जुलै 2015.
3) डॉ.शिवकुमार पाटील : इतिहास प्रदर्शक शास्त्रे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, जानेवारी, 2014.
4) Mill R.C., The Tourism System, Presentic Hall International, London, 1985.